सार्वजनिक सूचना

मेसर्स जेफ्रो रियल्टी एलएलपी यांच्याद्वारे प्रस्तावित केलेल्या सर्वे क्र. ३१ मौजे चोविसावाडी येथील जेफ्रो किंगस्टाउन, तालुका हवेली, पुणे, महाराष्ट्र येथील निवासी आणि व्यावसायिक विस्तार प्रकल्पाला पर्यावरण विभागाकडून ईसी ओळख क्रमांक EC26C3801MH5394688N आणि ईसी फाइल: SIA/MH/INFRA2/568357/2026 दिनांक १०/०५/२०२६ सह पर्यावरणीय मंजुरी देण्यात आली आहे आणि ती परिवेश वेबसाइट १०/०५/२०२६ वर प्रकाशित करण्यात आली आहे आणि मंजुरी पत्राची प्रत परिवेशकडे उपलब्ध आहे आणि पर्यावरण विभाग महाराष्ट्राच्या पर्यावरण विभागाच्या वेबसाइटवर https://parivesh.nic.in वर देखील पाहता येईल.

संपादित/-
जेफ्रो रियल्टी एलएलपी

फॉर्म क्र. URC-2

अधिनियमाच्या अध्याय XXI च्या भाग I अंतर्गत नोंदणीबाबत सूचना देणारी जाहिरात
[कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ३७४(b) आणि कंपन्या (नोंदणीसाठी अधिकृत) नियम, २०१४ च्या नियम ४(१) अन्वये]

१ याद्वारे सूचित केले जाते की कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ३६६ च्या उप-कलम (२) अनुसार, या सूचनेच्या तारखेपासून पंधरा दिवसांनंतर परंतु तीस दिवसांच्या आत केंद्रीय नोंदणी केंद्र (CRC), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कॉर्पोरेट अफेयर्स (IICA), प्लॉट क्र. ६,७,८, सेक्टर ५, IMT मानेसर, जिल्हा गुरुग्राम (हरयाणा), पिन कोड-१२२०५० येथील निबंधकाकडे अर्ज करण्याचा प्रस्ताव आहे की जीवन शक्ती बायोएनर्जी एलएलपी (LLPIN: ACI-1295) ही मर्यादित दायित्व भागीदारी कंपनी अधिनियम २०१३ च्या अध्याय XXI च्या भाग I अंतर्गत शेअर्सद्वारे मर्यादित कंपनी म्हणून नोंदणीकृत केली जाऊ शकते.

२ कंपनीचे मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत: -
भारतात किंवा परदेशात अजैविक आणि सेंद्रिय रसायने, संपीडित बायोगॅस आणि सेंद्रिय खते, रासायनिक घटक आणि संयुगे, कोणत्याही प्रकारची रासायनिक उत्पादने आणि त्यांचे सर्व उप-उत्पादने यांची विक्री, उत्पादन, तंत्रज्ञान हस्तांतरण, व्यापार, निर्यात, आयात, निर्मिती, व्यवहार करणे; तसेच फार्मास्युटिकल उद्योग, कृषी, काच आणि सिरामिक उद्योग, रबर आणि रंग यांसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रयोगशाळा आणि वैज्ञानिक रसायनांसह; विशेषतः नवीकरणीय ऊर्जा आणि जैवइंधन; रसायन उद्योगातील तांत्रिक व व्यावसायिक सल्लागार सेवा; रसायने, ऊर्जा, यंत्रसामग्री, अभियांत्रिकी आणि इलेक्ट्रॉनिक उत्पादने, सॉफ्टवेअर, दूरसंचार उत्पादने, ग्राहक टिकाऊ वस्तू, बांधकाम, कृषी, पाणी, खाणकाम आणि ऑटोमेशन संबंधित तंत्रज्ञानात गुंतवणूक, विकास व व्यवहार; रसायने, खाद्य तयारी, वनस्पती आणि यंत्रसामग्री यांचे उत्पादन व व्यापार करण्याचा व्यवसाय सुरू करणे आणि चालू ठेवणे.

३ प्रस्तावित कंपनीच्या मसुदा मेमोरेंडम आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशनची प्रत कार्यालयात H-6, स्वप्नशिल्प सोसायटी, स.नं. १९/२, कोथरूड, पुणे, महाराष्ट्र – ४११०३८ येथे तपासण्यासाठी उपलब्ध आहे.

४ याद्वारे सूचित केले जाते की या अर्जास आक्षेप घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने या सूचनेच्या प्रकाशन तारखेपासून एकवीस दिवसांच्या आत केंद्रीय नोंदणी केंद्र (CRC), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कॉर्पोरेट अफेयर्स (IICA), प्लॉट क्र. ६,७,८, सेक्टर ५, IMT मानेसर, जिल्हा गुरुग्राम (हरयाणा), पिन कोड-१२२०५० येथील निबंधकाकडे लेखी आक्षेप कळवावा; तसेच एक प्रत H-6, स्वप्नशिल्प सोसायटी, स.नं. १९/२, कोथरूड, पुणे, महाराष्ट्र – ४११०३८ येथील नोंदणीकृत कार्यालयात पाठवावी.

दिनांक: ०६ जून २०२६
अर्जदारांची नावे

स्व/-	स्व/-	स्व/-
मिरोस सोल्युशन्स एलएलपी	अनिकेत नाईक निंबाळकर	नितीन आनंदराव शितोळे
DIN: 10651368	DIN: 00966418	DIN: 10691795

(त्यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री. रोहित मिलिंद सुमंत यांच्यामार्फत)

शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि.

नोंदणीकृत कार्यालय: 501, सालकॉन ऑरम, जसोला डिस्ट्रिक्ट सेंटर, नवी दिल्ली - 110025. **CIN: U65900DL2020PLC366027**

लिलाव सूचना

शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि. च्या पुढील कर्जदारांना याद्वारे सूचित करण्यात येते की त्यांनी बँकेकडून प्राप्त केलेले सुवर्ण कर्ज त्यांनी बँकेद्वारे स्वतंत्र सूचनांसह विविध मागण्या व सूचना पाठवण्यात आल्यावरही फेडलेले नाही. याद्वारे सर्व कर्जदारांना सूचित करण्यात येते की बँकेकडे अनामत म्हणून ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करण्याचे ठरविण्यात आले आहे आणि त्यानुसार जेथून हे कर्ज घेण्यात आले होते त्या **बँकेच्या शाखेच्या आवारात स. 11.00 वाजता** हा लिलाव करण्याचे निश्चित झाले आहे. कर्जदारांसह सर्व खातेधारक आणि आम जनता लिलावाच्या अटी व शर्तीनुसार सदर लिलावात सहभागी होऊ शकतात.

लिलावाचा दिनांक आहे 15-06-2026 रोजी स. 11.00 वाजता

अ.क्र.	शाखा	खाते क्र.	खाते धारकाचे नाव
1	माजिवडा ठाणे	103742517381	उमाकांत एस यादव
2	पुणे टिळक रोड	104242512935	जगताप एन मारुती
3	पुणे टिळक रोड	104246510167	विलास व्ही डांगे
4	पुणे टिळक रोड	104246510159	पूनम आर वाघ
5	पुणे टिळक रोड	104246510158	रेजीन एस इशत्ते
6	पुणे टिळक रोड	104242515086	सुशीलकुमार बी मागाडे
7	पुणे टिळक रोड	104246510147	नामदेव एल दळवी
8	पुणे टिळक रोड	104242515166	तुषार डी दारवटकर
9	पुणे टिळक रोड	104242515127	युवराज व्ही अवसरे
10	पुणे टिळक रोड	104246510166	उमेश टी चालेकर
11	पुणे टिळक रोड	104242515161	किरण आर जगताप
12	पुणे टिळक रोड	104242515137	राणी एच राऊत
13	पुणे टिळक रोड	104242512410	मंजू आर अलगुडे
14	पुणे टिळक रोड	104246510176	स्वाती एन मांढरे
15	पुणे टिळक रोड	104246510157	बिरादार आर शिवाजी
16	पुणे टिळक रोड	104242515136	आनंदराज बी रामासामी
17	पुणे टिळक रोड	104246510141	सुदर्शन एम बांगर

कोणतीही पूर्वसूचना न देता कोणतेही खाते लिलावातून वगळण्याचा किंवा लिलाव रद्द करण्याचा अधिकार बँक राखून ठेवते.

प्राधिकृत अधिकारी, शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि.

हनीवेल

हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेड
CIN : L29299PN1984PLC017951
नोंदणीकृत कार्यालय : ५६ व ५७, हडप्सार इंडस्ट्रियल ईस्टेट, पुणे-४११ ०१३.
फोन : +९१ २० ७११४ ८८८८; ईमेल : HAIL.investorservices@honeywell.com
वेबसाइट : https://www.honeywell.com/in/en/hail

सूचना
दावा न केलेले/ प्रदान न झालेले लाभांश व भागांचे "आयईपीएफ"कडे स्थानांतरण

सूचना याद्वारा इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड ("आयईपीएफ") ऑथोरिटी (अकाऊंटिंग, ऑडिट, ट्रान्सफर अँड रिफंड) रुल्स, २०१६ यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३च्या कलम १२४(६) च्या अनुसार देण्यात आली आहे, असे की कंपनीला सर्व लाभांशाचे, जे सलग सात वर्षांकरिता दावा न करता राहिले आहेत, "आयईपीएफ"कडे स्थानांतरण करणे आवश्यक आहे. सदर दावा न केलेल्या लाभांशाचा सविस्तर तपशील "एमसीए" तसेच कंपनीच्या वेबसाइटवर नियमितपणे अपडेट करण्यात आला आहे. याअधिक, भाग ज्यावरील लाभांश सलग सात वर्षे किंवा अधिक कालावधीकरिता दावा न करता राहिले आहेत ते "आयईपीएफ"कडे (ॲथोरिटीचे डिमॅट अकाऊंट) स्थानांतरण करण्यात येणार आहेत.

भागधारकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर वैयक्तिकरित्या पत्रव्यवहाराद्वारा ०२ जून, २०२६ रोजी कळविण्यात आले आहे, ज्यांचे लाभांश सलग सात वर्षांकरिता दावा न करता पडून आहेत आणि ज्यांचे भाग "आयईपीएफ"कडे स्थानांतरणास पात्र आहेत. संबंधित भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्वरित परंतु **उशिरात उशिरा ३१ ऑगस्ट, २०२६** पर्यंत, "एमयूएफजी ईन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड", कंपनीचे रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजन्ट ("आरटीए") यांच्याकडे यथोचितरित्या स्वाक्षरीकृत पत्राद्वारे, परत मिळण्यास, खालील पद्धतीत तुम्हाला देय असलेल्या व दावा न करता राहिलेल्या लाभांशास त्वरित दावा करावा.

जर भाग इलेक्ट्रॉनिक स्वरूपात आहेत : क्लाईंट मास्टर सूचीची एक प्रत सादर करावयाची आहे. प्रदान डिमॅट अकाऊंटच्या अनुसार नोंदणीकृत बँक अकाऊंटमध्ये करण्यात येणार आहे.

जर भाग प्रत्यक्ष स्वरूपात आहेत : खातेधारक असल्यानुसार तुमचे नाव लिहून मूळ कॅन्सल्ड चेक समाविष्ट पुष्ठ्यर्थ कागदपत्रांसमवेत त्यात नमूद केलेल्या सूचनांनुसार इन्व्हेस्टर सर्व्हिस रिक्वेस्ट फॉर्म आयएसआर-१, फॉर्म आयएसआर-२ व फॉर्म नं. एसएच १३ (नामांकन फॉर्म) किंवा फॉर्म आयएसआर ३ (नामांकन रद्द करणे) यथोचितरीत्या भरावेत. हे फॉर्म्स https://www.honeywell.com/in/en/hail या कंपनीच्या वेबसाइटवरून तसेच https://web.in.mpms.mufg.com/KYC-downloads.html या "आरटीए"च्या वेबसाइटवरून सुद्धा प्राप्त करता येतील.

सेबी सर्क्युलर दिनांकित ०३ नोव्हेंबर, २०२१ च्या अनुसार (त्यानंतर सर्क्युलर्स दिनांकित १४ डिसेंबर, २०२१, १६ मार्च, २०२३ व ०७ मे, २०२४ द्वारा सुधारित केलेले), प्रत्यक्ष स्वरूपात असलेल्या भागांकरिता थकित लाभांशाचे प्रदान, जर केवायसी अनुपालनार्थ असल्यास, केवळ बँक खात्यात थेट जमा केले जाणार आहे. या संबंधित, तुम्हास "आरटीए"कडे पीन कोड, मोबाईल नंबर, ईमेल आयडी, बँक तपशील, फोलिओ इत्यादी सर्व धारकांचे आधारशी लिंक्ड असलेला वैध पॅन, इ. सह पत्ता पूर्णतः अपडेट ठेवणे आवश्यक आहे. **कृपया नोंद घ्यावी की, थकित लाभांशाचे प्रदान केवळ आरटीए/ डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे बँक तपशीलाच्या अपडेशनवरच सुरू केले जाईल.**

जर आम्हास नमूद केलेल्या शेवटच्या तारखेपूर्वी प्रतिसाद मिळाला नाही, तर कंपनी खालीलनुसार कोणतीही पुढील सूचना न देता "आयईपीएफ"कडे भागांच्या स्थानांतरणाकरिता आवश्यक कार्यवाही सुरू करील.

- जर भाग प्रत्यक्ष स्वरूपात आहेत आणि "आयईपीएफ"कडे स्थानांतरण करावयास पात्र आहेत, तर कंपनी सदर प्रकरणावर आणि "आयईपीएफ"कडे भागांच्या स्थानांतरणाच्या हेतुप्रीत्यर्थ असलेल्या मूळ स्वरूपाऐवजी, प्रतिलिपीत भाग प्रमाणपत्रांचे निर्गमन करील व कंपनी प्रतिलिपीत भाग प्रमाणपत्रांचे डिमॅट स्वरूपात रुपांतरण करण्यास कॉर्पोरेट कार्यवाहीद्वारा डिपॉझिटरीस कळवील आणि "आयईपीएफ"च्या नावे स्थानांतरण केले जाईल. मूळ भाग प्रमाणपत्रे, जी मूळ भागधारकांच्या नावे नोंदणीकृत आहेत, आपोआप रद्द होतील आणि वाटाघाटीस अयोग्य म्हणून मानले जातील.
- जर भाग डिमॅट स्वरूपात आहेत आणि "आयईपीएफ"कडे स्थानांतरणास पात्र आहेत, तर कंपनी "आयईपीएफ ॲथोरिटी"च्या डिमॅट अकाउंटमध्ये स्थानांतरणाकरिता कॉर्पोरेट कार्यवाहीद्वारा डिपॉझिटरीजना कळवील.

कृपया नोंद घ्यावी की, उक्त रुल्सच्या अनुसार दावा न केलेली लाभांशाची रक्कम व "आयईपीएफ" ॲथोरिटीकडे स्थानांतरण केलेल्या भागांच्या बाबतीत कंपनीच्या विरोधात कोणताही दावा करता येणार नाही.

जर भागधारकांना या विषयाधीन प्रकरणावर कोणत्याही शंका असल्यास, ते hail.investorservices@honeywell.com यावरून कंपनीशी किंवा "आरटीए"कडे संपर्क साधू शकतील : "एमयूएफजी ईन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड", युनिट : हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेड, सी-१०१, पहिला मजला, २४७ पार्क, लाल बहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०० ०८३; टेलि क्र. : +९१ ८१०८११८४८४; वेबसाइट : https://in.mpms.mufg.com/ किंवा https://web.in.mpms.mufg.com/helpdesk/Service_Request.html याद्वारा विनंती पाठवू शकतील.

हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेडकरिता
इंदू दर्याणी
कंपनी सचिव

स्थळ : पुणे
दिनांक : ०५ जून, २०२६

AUTHUM ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

नोंद. कार्या.: 707, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल रोड, नरीमन पॉईन्ट, मुंबई - 400 021.
फोनः (022) 6747 2117 **फॅक्सः** (022) 6747 2118 ईमेल : info@authum.com

ताबा सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(1) नुसार)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (''एआयआयएल'') (एनसीएलटी यांच्या दि. 10.05.2024 रोजीच्या आदेशान्वये रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड (''RCFL'') कडून वित्त व्यवसायाचे AIIL मध्ये एकत्रीकरण झाल्यावर निर्माण झालेली कंपनी) यांचे प्राधिकृत अधिकारी असून सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत **26-11-2021** रोजी **मागणी सूचना** निर्गमित केली ज्यात **कर्जदार अमोल धन्यकुमार कोरे, सह-कर्जदार दिपाली अमोल कोरे** यांना कर्ज खाते क्र. RHHLPUN000061661 अंतर्गत **रु. 62,27,218/- (रुपये बासष्ट लक्ष सत्तावीस हजार दोनशे अठरा फक्त)** चा पुढील व्याज व शुल्कांसह सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांच्या आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने याद्वारे कर्जदार/सह-कर्जदार आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सदर नियमांमधील नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **दि. 04/06/2026** रोजी **प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे.

कर्जदार/सह-कर्जदार आणि आम जनतेस यांना सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि तसा कोणताही व्यवहार केल्यास तो ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्या दि. 04-06-2026 रोजीनुसार **रु. 1,24,85,033.46/- (रुपये एक कोटी चोवीस लक्ष पंच्याऐंशी हजार तेहत्तीस आणि शेहेचाळीस पैसे फक्त)** अधिक त्यावरील पुढील व्याज व शुल्के एवढ्या रकमेच्या भाराधीन असेल. अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदार / सह-कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(8) मधील तरतुदींकडे वेधण्यात येते.

अचल मालमत्तेचे वर्णन

निवासी सदनिका क्र. 103, दुसरा मजला, ए विंग, गट क्र. 224/8/ए, महादेव मळा पाटस रोड, बारामती, महाराष्ट्र - 413102.

दिनांक: 04.06.2026 | **प्राधिकृत अधिकारी,**
स्थान: पुणे | **ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**

नियम-१३(१)(ए) पहा. फॉर्म नं.३

कर्ज वसुली न्यायाधिकरण, पुणे

युनिट क्र. ३०७ ते ३१० तिसरा मजला, काकडे बिझ आयकॉन बिल्डिंग, शिवाजी नगर, पुणे-४११००५
Case No.: OA/133/2021

सदर कायद्याच्या कलम १९ पोटकलम ४ आणि कर्ज वसुली न्यायाधिकरण नियम १९९३ च्या नियम ५ च्या उपनियम २ए अंतर्गत समन्स

इंडियन बँक **विरुद्ध** Exh. No.: 13730
मे. फोटो फ्लॅश कलर लॅब अँड स्टुडिओ प्रोप्रा.श्री. हेमंत चतुरभुज क्षीरसागर

प्रति,
(१) मे. फोटो फ्लॅश कलर लॅब अँड स्टुडिओ प्रोप्रायटर : श्री. हेमंत चतुरभुज क्षीरसागर
सर्व्हे क्र. ५८८/१, दुकान क्र. ८, गणेश मार्केट, हमाल नगर, गंगाधाम चौकासमोर, मार्केट यार्ड, पुणे, महाराष्ट्र - ४११०३७.
(२) श्री. हेमंत चतुरभुज क्षीरसागर
सर्व्हे क्र. ५८८/१, दुकान क्र. ८, गणेश मार्केट, हमाल नगर, गंगाधाम चौकासमोर, मार्केट यार्ड, पुणे, महाराष्ट्र - ४११०३७.
(३) सौ. अरुणा शरद मोरे
८३७/२/३, पोस्ट ऑफिस रोड, आमराई, बारामती, तालुका - बारामती, जिल्हा पुणे, महाराष्ट्र - ४१३१३३.

-: समन्स :-

ज्याप्रमाणे
ओए/१३३/२०२१ हा २५/०३/२०२६ रोजी माननीय पीठासीन अधिकारी/निबंधक यांच्यासमोर सुनावणीसाठी सूचीबद्ध होता. तरी सदर कायद्याच्या कलम १९(४)च्या अंतर्गत सदर न्यायालयाने समन्स/ नोटीस जारी केली आहे. कर्ज रक्कम **रु. ७६९५७८७/-** च्या वसुलीसाठी तुमच्या विरुध्द ओए दाखल करण्यात आला आहे. (कागदपत्रांच्या प्रतींसह अर्ज जोडला आहे).
सदर कायद्याच्या कलम १९ च्या उप-कलम (४) नुसार, तुम्ही, प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देशित केले जाते आहे की,
१) समन्स मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत अर्जदारांचा अर्ज मंजूर का केला जाऊ नये याबाबत कारणे दाखवा.
२) ओए अर्जातील अनुक्रमांक ३ ए मध्ये नमुद केलेल्या मालमत्तेव्यतिरिक्त इतर मालमत्तेचे तपशील देणे.
३) या अर्जाचा निकाल येईपर्यंत मुळ अर्जातील अनुक्रमांक ३ए मध्ये नमुद केलेली मालमत्ता अथवा इतर तपशिल दिलेली मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करण्यात येवू नये.
४) बोजा असलेली मालमत्ता आणि / किंवा ओए अर्जातील क्रमांक३ए नमुद केलेल्या मालमत्ता तुम्हाला विक्री लीज किंवा अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत करता येणार नाही.
५) सदर मालमत्तासंबंधीत काही व्यवहार केल्यास त्यांची विक्री रक्कम तुम्हाला सदर मालमत्तेवरील बोजा असलेल्या बँकेच्या खात्यात जमा करावा लागेल.
तुम्हाला लिखित स्टेटमेंट (अर्जदाराला कॉपीसह) सादर करण्यासाठी निर्देशित करण्यात येत आहे. आणि **१४/०७/२०२६** रोजी **सकाळी १०:३० वाजता** रजिस्ट्रारसमोर हजर राहण्याचे निर्देश देण्यात येत आहे असे न केल्यास तुमच्या अनुपस्थितीत अर्जावर सुनावणी आणि निर्णय घेतला जाईल.
दि. ०७/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी आणि या न्यायाधिकरणाच्या शिक्क्यासहीत.

ठिकाण- पुणे | **रजिस्ट्रार, कर्ज वसुली न्यायाधिकरण, पुणे**

LIC HFL एलआयसी हौसिंग फायनान्स लि.

शुद्धीपत्रक

एलआयसी हाऊसिंग फायनान्स लि., यांनी कर्जदार/जामीनदार **निरामय हॉस्पिटल्स प्रा. लि.** यांच्या तारण मिळकतीच्या **ई लिलावाची नोटीस दिनांक ५ जून २०२६ रोजी इंडियन एक्स्प्रेस आणि लोकसत्ता** या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केली आहे. त्यामधील मजकूरात बदल असून बदल असलेला बदललेला मजकूर पुढे दिला आहे. खाली दिलेला मजकूरच ग्राह्य धरावा. नोटीसीमधील अन्य तपशीलात बदल नाही.
ताब्याचा प्रकार व ताब्याचा दिनांक: **इमारत अ:** प्रतिकात्मक ताबा, दिनांक २६.११.२०२४ मा. डी आर टी पुणे यांच्या विशेष अर्ज एसए/२२४/२०२५ मधे दिलेल्या दिनांक २६.०३.२०२६ या आयए क्र.११६०/२०२६ या खाली दिलेल्या आदेशानुसार: अर्जदार दाव्यातील मिळकत प्रतिवादी फायनान्स कंपनी यांना दिनांक २७ मार्च २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता ताब्यात देतील व त्याचवेळी प्रतिवादी फायनान्स कंपनी अर्जदारांकडे फायनान्स कंपनीचे एजंट/प्रतिनिधी म्हणून दोन महिन्यांचे कालावधीसाठी ताब्यात देतील. (कृपया सदर आदेशाचा संदर्भ घ्यावा)
त्यानंतर सदर मिळकतीचा **प्रत्यक्ष ताबा** कोर्ट कमिशनर मार्फत दिनांक २७.०३.२०२६ रोजी घेण्यात आला आहे.
इमारत क्र: ब: प्रत्यक्ष ताबा घेतल्याची तारीख: २४.१२.२०२५.
कर्जदाराचे/जामीनदाराचे नाव व कर्जखाते क्र. निरामय हॉस्पिटलस प्रा. लि. व सर्व व्यवस्थापकीय संचालक/संचालक/अधिकृत स्वाक्षरीदार. कर्ज खाते क्र.६२०२०००००६०२४.
सदर नोटीसीमधील **क्र. १०** मधील बोली वाढविण्याची किमान **रक्कम रु.१०,०००** अशी दिली आहे. त्या ऐवजी ती रक्कम **रु.१,००,००० (रुपये एक लाख)** अशी वाचावी.

अधिकृत अधिकारी

ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्स्प्रेस झोन, ए विंग, दहावा मजला, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, गोरेगाव (पू), मुंबई -400 063, भारत फोनः +918433508283 | वेबसाईट : www.rathi.com

ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे कर्ज खाते **क्र. APPL00006093** असलेल्या खालील कर्जदार / सह-कर्जदार/जामीनदार आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड [''एआरजीएफएल''] **(सुरक्षित धनको)** यांचेकडे तारण असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्यात आलेला असून तिची कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदारांकडून घेणे असलेल्या अनुसूचीमध्ये नमूद एकूण थकबाकी आणि तीवरील करारातील दराने व्याज आणि वसुलीच्या दिनांकापर्यंतचे इतर खर्च व शुल्के एवढ्या रकमेच्या वसुलीसाठी खाली अनुसूचीमध्ये नमूद दिनांकास https://sarfaesi.auctiontiger.net या वेबसाईटच्या माध्यमातून ऑनलाईन ई-लिलावाद्वारे ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर विक्री करण्यात येईलः

कर्जदाराचे नावः मे. अॅडव्हान्स कॅड टेक्नॉलॉजीज प्रा.लि. (कर्जदार), ऑफिस क्र. 13, पाचवा मजला, पुष्पा शांती टॉवर, कर्वे पुतळ्याजवळ, कोथरूड, कर्वे रोड, पुणे - 411038.

सह-कर्जदारांची नावेः (2) श्री मिलिंद दादाजी फुटाणे (सह-कर्जदार), सदनिका क्र. 25, सुरभी हाईट्स, जुना एनडीए रोड जकात नाका, वारजे आंबेडकर चौक, पुणे - 411052. **(3) मे. 3डी इनोव्हेटीव्ह टेक्नॉलॉजीज प्रा.लि. (सह-कर्जदार),** ऑफिस क्र. 13, पाचवा मजला, पुष्पशांती टॉवर, कर्वे पुतळ्याजवळ, कोथरूड, कर्वे रोड, पुणे इ 411038. **(4) श्रीमती पल्लवी मिलिंद फुटाणे,** सदनिका क्र. 25, सुरभी हाईट्स, जुना एनडीए रोड जकात नाका, वारजे आंबेडकर चौक, पुणे - 411052.

मालमत्तेचा पत्ताः 1) ऑफिस क्र. 13, पाचवा मजला, पुष्पशांती टॉवर, स.क्र. 147, घ.क्र. 6बी, 7, प्लॉट क्र. 03, सीटीएस क्र. 705, कोथरूड, पुणे, महाराष्ट्र, भारत. 2) ऑफिस क्र. 14 व 15, पाचवा मजला, पुष्पशांती टॉवर, स.क्र. 147, घ.क्र. 6बी, 7 प्लॉट क्र. 03, सीटीएस क्र. 705, कोथरूड, पुणे, महाराष्ट्र, भारत.

थकबाकी रक्कम (मागणी सूचनेनुसार अधिक पुढील व्याज व शुल्के)	**रु. 1,46,78,007/-** (रुपिक कोटी शेहेचाळीस लक्ष अठ्ठ्याहत्तर हजार सात फक्त)
लिलाव दिनांक -	25 जून, 2026
आरक्षित किंमत	**रु. 1,30,05,000/-** (रुपये एक कोटी तीस लक्ष पाच हजार फक्त)
बयाणा रक्कम	आरक्षित किमतीच्या 10%
ताब्याची स्थिती	प्रत्यक्ष ताबा
किमान बोली वृद्धी रक्कम	रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)
इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या पाहणीचा दिनांक व वेळ	18 जून, 2026 रोजी स. 10 ते दु. 4 वाजेपर्यंत
केवायसी दस्तावेज / बयाणा रकमेचा पुरावा इ. सह निविदा प्रपत्र सादर करण्याचा दिनांक व वेळ	23 जून, 2026 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत केवायसी दस्तावेजांसह.
ऑनलाईन प्रस्ताव उघडण्याचा दिनांक व वेळ	25 जून, 2026 रोजी स. 10.00 ते दु. 1.00 वाजेपर्यंत

टीपः इच्छुक बोलीदार / खरेदीदारांनी लिलाव प्रक्रियेशी संबंधित अटी व शर्तींच्या तपशिलासाठी कृपया आनंद राठी ग्रुपच्या वेबसाईटला www.rathi.com येथे भेट द्यावी.

हे प्रकाशन वरील कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार यांचेसाठी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) व 9(1) अंतर्गत विहित 15 दिवसांची सूचनादेखील आहे.

दिनांकः 5 जून, 2026 | **आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड,**
स्थानः पुणे | **प्राधिकृत स्वाक्षरीकार**

सारस्वत बँक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अंचलीय कार्यालय, ८/३ कर्वे रोड, पुणे ०४
वसुली विभाग, ४३३/बी/२, माधव अपार्टमेंट, दुसरा मजला, जुनी जिल्हा परिषद इमारती जवळ, पुणे ०१.
दूरध्वनी क्र.:(०२०)२६०६२६६७, २६०६१९५५, २६०६११८४, २६०६११८५

ताबा नोटीस (स्थावर मालमत्तेकरिता)
परिशिष्ट IV [रूल ८(१)]

ज्याअर्थी, खाली सही करणार, **सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.** चे अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरीटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इन्टरेस्ट ॲक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ सह कलम १३ (१२) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेले कर्जदार यांना **मागणी नोटीस** बजावली होती. कर्जदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, विशेषत: कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या नियम ८ सह कलम १३(४) अंतर्गत खाली नमूद केलेल्या तारखांना मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे. विशेषत: कर्जदार तसेच सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.** यांना येणे असलेल्या रकमेच्या अधीन राहील.

स्थावर मालमत्तेचा तपशील

अनु. क्र.	कर्जदाराचे नाव	स्थावर मालमत्तेचे वर्णन	मागणी नोटीस व प्रत्यक्ष ताबा घेतल्याची तारीख	दि. २८.०४.२०२४ रोजी येणे रक्कम
१.	**१. श्री. बोऱ्हाडे विलास संपत** (मुख्य कर्जदार/गहाणखतदार) **२. सौ. बोऱ्हाडे प्रमिला विलास** (जामीनदार)	मा. उप निबंधक हवेली यांचे कार्यक्षेत्रातील, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील भोसरी (कासारवाडी), ता. हवेली, जि. पुणे येथील स. नं. ४४८, हिस्सा नं. ३ए/१/२ वरील प्रोजेक्ट **'एस पी होम्स'** येथील क्षेत्र हे. ०० आर ०५ व सिटीएस. नं. २२०५ क्षेत्र ५१० चौ. मि. यावरील **इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ४०१.** क्षेत्र ६४२.०७ चौ. फूट चटई क्षेत्र, म्हणजेच ५९.६५ चौ.मि. म्हणजे विक्रीयोग्य ८३४.६९ चौ. फू. + एक कॉमन पार्किंग सह	२९.०४.२०२४ आणि ०४.०६.२०२६	रु. १९,५७,०८६/- अधिक दि. ०१.०४.२०२४ पासूनचे व्याज

दिनांक : ०६.०६.२०२६ | **अधिकृत अधिकारी**
स्थळ : पुणे | (मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा) | **सारस्वत को-ऑप बँक लि.**

Muthoot Homefin (India) Ltd.

CIN - U65922KL2011PLC029231
कॉर्पोरेट कार्यालय : मुथूट होमफिन (इंडिया) लि., 19/ई, द रुबी, सेनापती बापट मार्ग, तुलसी पाईप रोड, रुपारेल कॉलेज जवळ, दादर पश्चिम, मुंबई - 400028.
शाखा कार्यालय : मुथूट होमफिन (इंडिया) लि. कार्यालय क्र. 7, वीटाराग कन्स्ट्रक्शन, 83-ए, पहिला मजला, कन्हाळे प्लाझा च्या पुढे, नेव्हल पेट्रोल पंप जवळ, डफरीन चौक रेल्वे लाईन सोलापूर- 413001.

परिशिष्ट-IV-A [नियम 8(6) मधील तरतुदी पहा]
खाजगी करार व विक्री करिता जाहीर सूचना

मुथूट होमफिन (इंडिया) लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत, येथे नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतल्याच्या अनुषंगाने, कर्जदारांकडून देय असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी, खाली वर्णन केल्याप्रमाणे, ''जशी आहे जेथे आहे'', "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर खालील स्वाक्षरीकार यांच्याद्वारे अचल मालमत्ता जी ताब्यात आहे **या मालमत्तेच्या खरेदीसाठी सीलबंद कव्हरमध्ये ऑफर मागविण्यात येत आहेत, ज्याचे तपशील खाली दिले आहेत :-**

अ. क्र.	कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / कर्ज खाते क्र. / शाखा	मागणी सूचना दिनांक आणि रक्कम	अचल मालमत्तेचे वर्णन	आरक्षित किंमत	बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) (आ. किं. च्या 10%)
1.	अंबोजी बाबुराव बडदे / सुजाता अंबोजी बडदे / SOL-NHL-000728 / सोलापूर	10-सप्टेंबर-2024 रु. 12,42,281/- रुपये बारा लाख बेचाळीस हजार दोनशे एक्याऐंशी फक्त.	बंगला, गट क्र. 2996/2 भाग, विजापूर, पंढरपूर रोड, दीपू नर्सरी जवळ आणि महादेव मंदिराच्या मागे, मंगळ वेढा जि सोलापूर- 413305. चतुःसीमा पुढीलप्रमाणे : उत्तर : गट क्र. 2996/2 मधील उर्वरित जमीन, दक्षिण : मारुती कुकडे यांची जमीन, पूर्व : रस्ता, पश्चिम : उर्वरित जमीन.	रु. 10,86,500/- रुपये दहा लाख शहाऐंशी हजार पाचशे फक्त.	रु. 1,08,650/- रुपये एक लाख आठ हजार सहाशे पन्नास फक्त.

1. लिलाव **''जशी आहे जेथे आहे'' आणि "जशी आहे जे काही आहे"** या तत्त्वावर आयोजित केला जात आहे.
2. लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्ती विहित निविदा फॉर्ममध्ये समाविष्ट केल्या आहेत, जे वर नमूद केलेल्या प्रादेशिक कार्यालयात उपलब्ध आहेत.
3. 'मुथूट होमफिन (इंडिया) लिमिटेड' च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे देय असलेल्या ईएमडीसह विहित निविदा फॉर्ममध्ये सीलबंद बोली/ऑफर सादर करण्याची अंतिम तारीख **25 जून 2026 रोजी दुपारी 04:00** वाजेपर्यंत केवायसी सह प्रादेशिक कार्यालयात वर नमूद केलेल्या पत्त्यावर आहे. ज्या निविदा पूर्णपणे भरल्या नाहीत किंवा शेवटच्या तारखेनंतर प्राप्त झाल्या आहेत त्या निविदा अवैध मानल्या जातील आणि त्यानुसार त्या नाकारल्या जातील. ईएमडीवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
4. स्थावर मालमत्तेच्या पाहणीची **तारीख 24 जून 2026** रोजी दुपारी 01:00 ते 03:00 या वेळेत आहे.
5. मालमत्तेसाठी बोली / ऑफर लिलाव उघडण्याची **तारीख 26 जून 2026** रोजी **दुपारी 01:00** वाजता वरील उल्लेखित शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून असेल.
6. कोणत्याही थकबाकी असलेल्या वैधानिक सूचना आणि भार/कर थकबाकी इत्यादींच्या देयकासाठी एमएचआयएल जबाबदार राहणार नाही आणि त्यांची रक्कम भरण्याची जबाबदारी यशस्वी लिलाव खरेदीदार यांची असेल. इच्छुक बोलीदाराने मालमत्तेच्या भारांच्या मालकी हक्काबाबत स्वतः स्वतंत्र चौकशी करावी आणि त्याबद्दल तपासणी करून स्वतःचे समाधान करावे.
7. सर्वाधिक बोलीदार एमएचआयएल लिमिटेड च्या मान्यतेच्या अधीन असेल. प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे कोणतेही कारण न देता प्राप्त झालेल्या सर्व ऑफर/बोली स्वीकारण्याचा अधिकार राखून आहे. त्यांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.
8. कर्जदार / जामीनदार यांना सरफेसी कायदा, 2002 अंतर्गत लिलावाच्या तारखेपूर्वी वर नमूद केलेली रक्कम भरण्यासाठी 15 दिवसांची विक्री सूचना देण्यात येत आहे, तसे न झाल्यास स्थावर मालमत्तेचा लिलाव केला जाईल आणि उर्वरित रक्कम, जर असेल तर ती व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. जर कर्जदाराने मुथूट होमफिन (इंडिया) लिमिटेड ची देय रक्कम विक्रीच्या तारखेपूर्वी पूर्णपणे भरली तर लिलाव बाजूला ठेवला जाईल.

अधिक माहितीसाठी, वरील कार्यालयीन पत्त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधा. संपर्क व्यक्ती - **नितीन नखाले - 8600001418.**

दिनांक : 06 जून 2026 | **स्वा./- प्राधिकृत अधिकारी,**
ठिकाण : सोलापूर | **मुथूट होमफिन (इंडिया) लिमिटेड**

रुपयाला सावरण्यासाठी केंद्र-रिझर्व्ह बँकेची मोर्चेबांधणी

सरकारी रोख्यांतील भांडवली नफा परकीय गुंतवणूकदारांसाठी करमुक्त

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

रुपयाची दोन महिन्यांतील सर्वोत्तम झेप

मध्यम मुदतीत डॉलरचा ओघ वाढवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने उपाययोजना जाहीर केल्यानंतर, शुक्रवारी भारतीय रुपयाने दोन महिन्यांतील सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. रुपया ८९ पैशांनी (०.९ टक्के) मजबुती मिळवून, प्रति डॉलर ९४.९३ या पातळीवर बंद झाला. चालू वर्षात २ एप्रिलनंतरची ही रुपयाची सर्वात मोठी वाढ आहे.

मुंबई: इराणमधील युद्धामुळे निर्माण झालेले ऊर्जा संकट, महागलेले तेल आणि परकीय भांडवलाचा बाहेर जाणारा ओघ यामुळे ढेपाळत असलेल्या रुपयाला सावरण्यासाठी केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी अनेकांगी पावले टाकली. केंद्राने परकीय गुंतवणूकदारांना सरकारी रोख्यांतील भांडवली नफ्यापासून सूट बहाल केली, तर रेपो दर जैसे थे ठेवत डॉलरचा ओघ वाढवण्यासाठी मध्यवर्ती बँकेने करसवलती आणि अनिवासी भारतीयांसाठी विशेष प्रोत्साहनांची घोषणा केली. परिणामी रुपयाने अमेरिकी डॉलरच्या तुलनेत दोन महिन्यांतील सर्वोच्च अशी ८१ पैशांनी कमाई केली.

रुपयावरील ताण कमी करण्यासाठी केंद्र सरकारने सरकारी रोख्यांमधील परदेशी गुंतवणूकदारांवरील भांडवली नफा कर आणि व्याज उत्पन्नावरील २० टक्के कर रद्द करण्याची घोषणा केली. हा निर्णय १ एप्रिल २०२६ पासून लागू होणार आहे. सध्या, १२ महिन्यांपेक्षा जास्त काळ धारण केलेल्या सूचिबद्ध कंपन्यांचे समभाग आणि रोख्यांवर परदेशी गुंतवणूकदारांना १२.५ टक्के दीर्घकालीन भांडवली नफा कर भरावा लागतो. याशिवाय, रिझर्व्ह बँकेने सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना डॉलरमध्ये कर्ज उभारण्यासाठी सवलतीच्या परकीय चलन स्वॅपची सुविधा सप्टेंबरअखेरपर्यंत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. अनिवासी भारतीयांच्या परकीय चलन ठेवींवर बँकांना हेजिंग खर्चाची भरपाईही दिली जाणार आहे.

या उपाययोजनांमुळे देशात ४० ते ६० अब्ज डॉलरपर्यंतचा अतिरिक्त परकीय निधी येऊ शकतो, असा अंदाज अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. तसेच, आकर्षक परतावा पाहता, जागतिक रोखे गुंतवणूकदारांकडून भारतातील गुंतवणुकीचे प्रमाण आणखी वाढण्याची शक्यता आहे.

रिझर्व्ह बँकेच्या उपाययोजना काय?

■ दीर्घकालीन सरकारी रोख्यांमध्ये परदेशी गुंतवणुकीला वाट खुली :
रिझर्व्ह बँकेने 'फुल्ली अॅक्सेसिबल रूट' या विशेष मार्गांतर्गत परदेशी गुंतवणूकदारांना सरकारच्या सर्व नवीन १५ वर्षे, ३० वर्षे आणि ४० वर्षांच्या दीर्घकालीन सरकारी रोख्यांमध्ये थेट गुंतवणूक पूर्णपणे खुली केली आहे. यामुळे भारताच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी असलेल्या रोख्यांमध्ये परदेशी बँका, पेन्शन फंड आणि मोठे गुंतवणूकदार हजारो कोटींची थेट गुंतवणूक करू शकतील.

■ परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणुकीवरील मर्यादा शिथिल :
सामान्य मार्गाने गुंतवणूक करणाऱ्या परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांसाठी निर्धारित केली गेलेली गुंतवणुकीची निश्चित मर्यादा शिथिल केली गेली आहे.

■ अनिवासी भारतीयांसाठी मोठी संधीः सूचिबद्ध समभागांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी अनिवासी भारतीय आणि परदेशात राहणाऱ्या सर्व भारतीय व्यक्तींसाठी (ओसीआय) गुंतवणुकीची मर्यादा वाढवण्यात आली आहे. ही सुविधा लागू केल्यामुळे शेअर बाजारात परदेशी निधी वाढेल.

■ सरकारी कंपन्यांसाठी कर्ज खिडकी खुली : सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांनी परदेशातून उभारलेल्या कर्जासाठी सवलतीच्या दरातील 'फॉरेक्स स्वॅप विंडो'ची मुदत ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत वाढवली आहे. याचा अर्थ बँकांना पुढील काही महिने रिझर्व्ह बँकेशी डॉलर आणि रुपयांची देवाणघेवाण (अदलाबदल) करून बाजारातील आर्थिक परिस्थिती हाताळण्याची मुभा असेल. सरकारी कंपन्यांना बाह्य वाणिज्य कर्जाचा खर्च आटोक्यात ठेवता येईल.

■ बँकांच्या परकीय चलन ठेवींना दिलासा : बँकांनी अनिवासी भारतीयांकडून उभारलेल्या ३ ते ५ वर्षांच्या परकीय चलनातील ठेवींवरील संपूर्ण हेजिंग-कॉस्ट सपोर्टची मुदत ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे बँकांना परकीय चलन आकर्षित करणे सोपे होईल.

■ पैसे भारतात आणण्याच्या निर्यातदारांच्या मुदतीत कपातः निर्यातदारांना त्यांच्या मालाचे पैसे परदेशातून भारतात आणण्यासाठी मिळणारा कालावधी १५ महिन्यांवरून पुन्हा ९ महिने करण्यात आला आहे. या निर्णयामुळे परकीय चलन भारतीय यंत्रणेत अधिक वेगाने आणि वेळेत परत येईल.

ठेवींवरील व्याजदरांत भेदभाव अमान्य – गव्हर्नर

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : अधिक ठेवी आकर्षित करण्यासाठी अथवा ठराविक मोठ्या ठेवीदारांना अतिरिक्त व्याजदर किंवा अन्य मार्गाने वाढीव लाभ देणे स्वीकारार्ह नाही, असा स्पष्ट इशारा रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी शुक्रवारी दिला. बँकांनी ठेवी गोळा करताना पूर्ण पारदर्शकता राखावी, असेही त्यांनी बजावले.

सरकारी महामंडळाच्या ठेवी आकर्षित करण्यासाठी देशातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठ्या एचडीएफसी बँकेने जाहीर दरांपेक्षा अधिक व्याज दिले आणि हा अतिरिक्त लाभ 'विपणन खर्च' म्हणून दाखवला, असा आरोप 'इंडियन एक्स्प्रेस'मध्ये अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या वृत्तात करण्यात आला होता. एचडीएफसी बँकेने हे आरोप फेटाळले असले, तरी बँकिंग क्षेत्रात ठेवी गोळा करण्यासाठी अशा पद्धतींचा वापर सर्रास होत असल्याच्या चर्चा आहेत. या प्रकरणाबाबत विचारले असता, गव्हर्नर मल्होत्रा यांनी थेट एचडीएफसी बँकेचे नाव घेऊन भाष्य करण्यास नकार दिला. मात्र, त्यांनी एकूणच बँकिंग प्रणालीला याविषयी मध्यवर्ती बँकेने घालून दिलेल्या नियमांची आठवण करून दिली.

मल्होत्रा म्हणाले की, रिझर्व्ह बँक ठेवींवर भिन्न अथवा भेदभाव करणारे व्याजदर देण्यास परवानगी देत नाही. ज्येष्ठ नागरिकांना अधिक व्याजदर दिला जाऊ शकतो किंवा ठेवीच्या मुदतीनुसार व्याजदरामध्ये फरक असू शकतो. मात्र हे सर्व दर सार्वजनिकरित्या आणि संपूर्ण पारदर्शकतेने जाहीर करणे बंधनकारक आहे. बँकांनी जाहीर केलेल्या दरांव्यतिरिक्त कोणालाही अतिरिक्त लाभ किंवा परतावा दिला जात असेल, तर ते साफ अमान्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

रिझर्व्ह बँकेकडून इंधन दरवाढ; पावसाबद्दल चिंता

महागाईच्या अंदाजात अर्धा टक्क्यांनी वाढ

मुंबई : पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेले पुरवठ्यातील अडथळे आणि ऊर्जा व इतर वस्तूंच्या वाढलेल्या किमती यांचा आर्थिक हालचालींवर प्रतिकूल परिणाम, तसेच तुटीच्या पावसाचा विशेषतः ग्रामीण मागणी आणि अन्नधान्य किमतीतील संभाव्य वाढ पाहता, रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी चालू आर्थिक वर्षासाठी सकल राष्ट्रीय उत्पादन (जीडीपी) वाढीचा अंदाज ०.३ टक्क्यांनी कमी करणारे, तर महागाई दर तब्बल अर्धा टक्क्यांनी कडाकडण्याचे अनुमान व्यक्त केले.

अर्थव्यवस्थेच्या वाढीबद्दल चिंता अधिक गडद बनल्या असल्याचे स्पष्टपणे सूचित करणाऱ्या या अनुमानामुळे, शुक्रवारी संपलेल्या तीन दिवसांच्या बैठकीअंती पतधोरण दर आणि भूमिकेत यथास्थिती ठेवण्याची निर्णय घेतला.